मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंगळे रोडवरील वाहतूक कोंडीने चालक हैराण

## कोंडी सोडवण्यासाठी परिसरातील सोसायटीधारक एकवटले : समस्या मार्गी न लागल्यास प्रशासनाला जागे करण्यासाठी रस्त्यावर उतरण्याची तयारी

**पिंपरी | मनीषा थोरात-पिसाळ**

सोनवणे वस्ती ते सत्संगपर्यंतचा चोवीस मीटर रस्ता तसेच चिखली आकुर्डी रस्त्यावरील वाहतूक कोंडीने वाहनचालक व परिसरातील नागरिक हैराण झाले आहेत. वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पिंगळे रोडवरील आजुबाजूच्या सोसायटीधारकांनी वज्रमुट केली आहे. लवकरात-लवकर ही समस्या मार्गी न लागल्यास प्रशासनाला जागे करण्यासाठी रस्त्यावर उतरण्याची तयारी केली आहे.

मागील पाच दिवसांपूर्वी वाहतूक कोंडीने हैरान असलेल्या परिसरातील नागरिकांनी तसेच सोसायटीतील चेअरमन यांनी बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये रस्त्याचा प्रश्न, वाहतूक कोंडी, रस्त्यावरील खड्डे या समस्यांवर चर्चा झाली. या समस्यां लवकरात-लवकर मार्गी लागाव्यात यासाठी प्रशासनाकडे प्राथमिक स्वरूपात निवेदन, त्यानंतर समस्या न सुटल्यास रस्त्यावर उतरण्याचा इशारा सोसायटीतील सदस्यांनी दिला आहे.





" रस्त्यावरील वाहतूक कोंडीमुळे पंधरा मिनिंटाच्या अंतरासाठी एक ते दीड तास पोहोचण्यास उशिर लागतो आहे. परिसरातील मुले शाळेला जाताना व घरी येताना या वाहतूक कोंडीत अडकतात. त्यांना घरी पोहचण्यास एक ते दीड तास उशिर होतो. घरी आल्यावर ते थकून जातात. तसेच पिंगळे रोडवर हॉस्पिटल असल्याने वाहतूक कोंडीमध्ये नेहमी रूग्णवाहिका अडकल्याचे चित्र पहायला मिळते. बिकट अवस्थेतील रूग्णांना हॉस्पिटलला पोहचण्यास किंवा उपचार मिळण्यास उशिरा झाला, किवा दुर्देवाने काही घड्ल्यास याला जबाबदार कोण ? त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न तत्काळ मार्गी लागणे आवश्यक आहे. प्रशासनाने यामध्ये लक्ष घालून हा प्रश्न मार्गी लावावा.

- योगेश पिंगळे, उद्योजक.

" चिखली-आकुर्डी रस्ता रूंदीकरणाचा रखडलेला विषय, अरूंद रस्ता वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरत आहे. या रस्त्यावर एमआयडीसी, रहिवाशी क्षेत्रातील वाहतूक कोंडीचा भर अधिक आहे. दररोज पिंगळे रोड वरून साने चौकात पोहचण्यासाठी कोंडीमुळे अर्धा तास लागतो. पाऊस पडल्यावर तर कोंडीने चालकांना नाकीनऊ येतात. प्रशासनाने तत्काळ लक्ष देऊन हा विषय मार्गी लावावा.

- विलास देशमुख,पार्श्व प्लॅटीनम.

" या रस्त्यावरील वाहतूक कोंडीमुळे कामावर पोहोचण्यासाठी घरातून खूप लवकर निघावे लागते. कामावरून घरी पोहोचताना एक ते दीड तास अडकून पडावे लागते. वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटने खूप आवश्यक आहे. त्यासाठीच सर्व सोसायटीधारकांनी एकी केली असून, हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाला जागे करणार आहोत.

- दत्ता कदम,अदित्य शगुन बिल्डींग.

" घरातून बाहेर पडायचे म्हटले की पिंगळे रस्ता ते साने चौक वाहतूक कोंडीने अंगावर काटा येतो. क्लच-ब्रेकमुळे हात-पाय दुखून येतात. रस्त्यावर पडलेले खड्डे आणि वाहतूक कोंडी नित्याचीच झाली आहे. पिंगळे रोडसाठी महापालिका प्रशासनाने कोट्यावधी रूपये खर्च केले. मात्र वाहतूक कोंडीमुळे हा रस्ता पूर्ण गुदमरून जातो आहे. .

- संतोष भुसारे,पी स्केअर बिल्डींग.

# दहा वर्षात संरक्षण खात्याच्या जागा वेळीच ताब्यात न घेतल्यामुळे भोसरी मतदारसंघाला वाहतूक कोंडीचे ग्रहण : अजित गव्हाणे

## भोसरी विधानसभेतील एचसीएमटीआर रस्ते दुर्लक्षित; करदात्यांवर अन्याय : चिंचवड मतदार संघात 'डिफेन्स'ची 41 एकर जागा ताब्यात घेऊन रस्ते विकास

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड मतदार संघाची भोसरी मतदारसंघाशी तुलना केल्यानंतर विरोधाभास प्रकर्षाने जाणवतो. गेल्या दहा वर्षात संरक्षण हद्दीतील रस्त्यांबाबत येथे कोणता पाठपुरावा झाला असा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहत नाही. भोसरीतील आपटे कॉलनी लगतचा रस्ता हा त्यातीलच एक आहे . आपटे कॉलनी लगतचा रस्ता संरक्षण हद्दीतील जागेमध्ये येतो. हा रस्ता विकसित केला असता तर नाशिक फाटा मार्गे येणारी वाहने भोसरीमध्ये न येता ती थेट दिघीपर्यंत पोहोचू शकली असती. दिघी आणि आळंदीकडे जाणारी वाहने थेट इच्छितस्थळी जाऊ शकत नसल्याने आज या वाहनांचा ताण भोसरीतून जाणाऱ्या दिघी आणि आळंदी रस्त्यावर येत आहे. पुणे आळंदी रस्त्यावर दिघी जकात नाका ते विश्रांतवाडी रस्त्याबाबत झालेली आहे. दिघी येथील लष्कराच्या हद्दीतील जागा ताब्यात घेण्याबाबत प्रचंड अनास्था दिसून येत आहे. यामुळे या भागातील रहिवासी, ये-जा करणारे प्रवासी या सर्वानाच वाहतूक कोंडीचा प्रचंड फटका बसत आहे.

याबाबत दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात अजित गव्हाणे यांनी म्हटले आहे कि, पिंपरी चिंचवड शहरामध्ये भोसरी आणि चिंचवड या दोन मतदार संघामध्ये प्रचंड प्रमाणात रहिवासीकरण झालेले आहे. त्याच तुलनेत या भागामध्ये उद्योगधंदे आहेत. त्यामुळे या दोन मतदारसंघाची कायम तुलना होते. चिंचवड मतदार संघाची भोसरी मतदारसंघाशी तुलना केल्यानंतर विरोधाभास प्रकर्षाने जाणवतो. गेल्या दहा वर्षात संरक्षण हद्दीतील रस्त्यांबाबत येथे कोणता पाठपुरावा झाला असा प्रश्न येथील नागरिक विचारत आहेत. उच्च क्षमता बहुउद्देश वहन रस्ता अर्थात 'एचसीएमटीआर' प्रकल्प वर्षानुवर्षे कागदावर आहेत यामुळे रस्ते विकासाला मोठा खो बसला आहे असे गव्हाणे यांनी म्हटले आहे.



### करदात्या नागरिकांना उत्तर द्या !

» चिंचवड मतदार संघामध्ये तब्बल ४१ एकर जागा ताब्यात घेऊन त्यावर रस्ते विकास करण्यात आला आहे. या मतदारसंघात संरक्षण खात्याशी यशस्वी वाटाघाटी होतात तर हे गेल्या दहा वर्षात भोसरीत का होऊ शकले नाही?.मुंबई-पुणे रस्ता, नाशिक फाटा ते वाकड , औंध-रावेत रस्ता , पिंपळे सौदागर हे रस्ते लष्कराच्या जागा ताब्यात घेऊनच विकसित केले. हे क्षेत्र तब्बल 1 लाख 52 हजार 653 चौरस मीटर अर्थात ४१ एकर असून त्यासाठी पालिकेने 92 कोटी 19 लाख 18 हजार 784 रुपयांचा मोबदला लष्कराला दिला गेला. हेच भोसरी विधानसभा मतदारसंघांमध्ये का होऊ शकले नाही याचे उत्तर भाजप आमदारांनी करदात्या नागरिकांना द्यावे असे देखील अजित गव्हाणे यांनी म्हटले आहे.

# 'चिंचवड'मधून निवडणूक लढविणारच : भाऊसाहेब भोईर

## चिंचवड विधानसभा मतदारसंघातून कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढविणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

**पुणे | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या २००९ च्या निवडणुकीवेळी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप हे विधान परिषदेचे आमदार होते. काँग्रेसकडून मला उमेदवारी मिळाली असताना अचानक जगताप यांनी नेतृत्वाचा आदेश असल्याचे सांगत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. तेव्हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामुळे माझा पराभव झाला, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांनी केला. पोटनिवडणुकीतही उमेदवारी नाकारली असताना, आता चिंचवड विधानसभा मतदारसंघातून कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढविणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.



भाऊसाहेब भोईर यांनी महानिर्धार मेळावा घेऊन चिंचवडमधून निवडणूक लढविण्याचा निर्धार केला. मेळाव्याला माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक अतुल शितोळे, राजेंद्र जगताप, राजेंद्र साळुंखे, सुजित पाटील, गणेश लोंढे उपस्थित होते.

भाऊसाहेब भोईर म्हणाले, की मला सातत्याने डावलण्यात आले. २०१७ मध्ये सर्वजण भाजपमध्ये जात असताना आम्ही १२ नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेलो. असे असतानाही २०२३ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत मला उमेदवारी दिली नाही. सर्वेक्षणात माझे नाव नसल्याचे कारण दिले. नेत्यांना माझ्याबाबत कसला आकस होता, हे मला कळत नाही. २५ वर्षे नगरसेवक असताना स्थायी समितीचे अध्यक्षपद, महापौर, उपमहापौर, विषय समितीचे अध्यक्षपदही दिले नाही. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे अध्यक्षपदही दिले नाही. कुटुंबातही भांडण लावले.

भाजपच्या सत्ताकाळात महापालिकेची लूट झाली. त्यामुळे प्रत्येक नेत्याला पिंपरी- चिंचवड शहर आवडत आहे. प्रशासनाला काम करू दिले जात नाही. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता असे राज्यकर्त्यांचे समीकरण बनले आहे. शहराला पाच वर्षापासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. नियमित पाणी मिळत नाही. कचऱ्याचे व्यवस्थापन नाही. वाहतूक कोंडीच्या समस्येने नागरिक त्रस्त आहेत. गुन्हेगारी वाढली आहे. शहर बकाल बनले आहे. दडपशाही, झुंडशाही मोडीत काढण्यासाठी मी निवडणूक लढविणार आहे, असे भोईर म्हणाले.

उद्यापासून प्रचार सुरू करणार आहे. माझ्यासाठी सर्व पक्षांचे दरवाजे उघडे आहेत. माझ्या कार्यकर्त्यांना दम दिला, तर खपवून घेणार नाही, असा इशाराही भोईर यांनी दिला.

# प्रसिद्ध कीर्तनकार चैतन्य महाराजांना अटक

## रस्ता पोकलेनने बेकायदेशीरपणे खोदल्याने पोलिसांनी त्यांना बेड्या ठोकल्या आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

प्रसिद्ध कीर्तनकार आणि सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असणाऱ्या चैतन्य सयाजी वाडेकर (महाराज) यांना पिंपरी- चिंचवड पोलिसांनी अटक केली आहे. चैतन्य महाराज यांनी त्यांच्या इतर दोन भावांसह आणि नातेवाईकांसह घराच्या जवळून जाणारा रस्ता पोकलेनने बेकायदेशीरपणे खोदल्याने पोलिसांनी त्यांना बेड्या ठोकल्या आहेत. याप्रकरणी चैतन्य सयाजी वाडेकर (महाराज), अमोल सयाजी वाडेकर, प्रमोद सयाजी वाडेकर आणि ऋषिकेश शशिकांत सूर्यवंशी यांना अटक करण्यात आली आहे. मध्यरात्री त्यांना अटक करण्यात आली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, म्हाळुंगे परिसरामध्ये चैतन्य महाराज वाडेकर हे राहतात. त्यांच्या घराजवळ एक कंपनी आहे. त्या ठिकाणाहून जाणाऱ्या रस्त्यावरून त्यांचे वाद आहेत. बुधवारी रात्री कंपनीत जाणारा रस्ता बेकायदेशीर खोदला. यावेळी त्यांचे इतर एक नातेवाईक आणि दोन बंधू होते. असं तक्रारीत म्हटलं आहे. तसेच कंपनीच्या कंपाउंडचे पत्रे देखील काढले आहेत. अखेर या प्रकरणी कंपनीचे व्यवस्थापक अजित पाटील यांनी म्हाळुंगे पोलिसात तक्रार दिली आहे.

याप्रकरणी म्हाळुंगे पोलिसांनी चैतन्य सयाजी वाडेकर, अमोल सयाजी वाडेकर, प्रमोद सयाजी वाडेकर आणि ऋषिकेश शशिकांत सूर्यवंशी यांना अटक केली आहे. चैतन्य महाराज वाडेकर हे नेहमीच सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असतात. ते रिल्स देखील बनवतात. त्यांचे सोशल मीडियावर लाखो चाहते आहेत. त्यांच्या या अटकेमुळे त्यांच्या चाहत्यांना धक्का बसला आहे.

# सहशहर अभियंतापदी श्री.देवान्ना गट्टूवार यांना पदोन्नती

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झालेल्या सर्वसाधारण सभेत पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झालेल्या सर्वसाधारण सभेत महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता देवान्ना गट्टूवार यांची सहशहर अभियंता "पदी पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली असल्याचे पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाने प्रसिद्धीस दिले आहे.



देवान्ना गट्टूवार त्यांच्याकडे सध्या महापालिका ग आणि क या दोन प्रभागांचा कार्यकारी अभियंता म्हणून पदभार आहे. महानगरपालिकेची मुख्य प्रशासकीय इमारत बांधण्याचे काम सुरू असून त्याठिकाणी इमारतीचे स्थापत्य विषयक कामकाजाची जबाबदारी काही काळ त्याच्यावर सोपविण्यात आली होती. तसेच मागील दोन महिन्यापूर्वी मोशी येथील उभारत असलेल्या छत्रपती संभाजी महाराज यांचा १०० फुटी पुतळा उभारण्यात येत आहे, या पुतळ्याचे स्थापत्य विषयक काम पाहण्याची जबाबदारी श्री गट्टूवार हे अत्यंत चोखपणे सांभाळत आहेत. महापालिकेचे प्रामाणिक व महापालिकेच्या हिताची कामे करणारे अभियंता म्हणून त्यांची ओळख आहे.



# पहिल्या सहामाहीत महापालिकेच्या तिजोरीत 505 कोटींचा कर

## 3 लाख 90 हजार मालमत्ता धारकांनी 505 कोटींचा कर भरला : गतवर्षीच्या तुलनेत यंदा 74 कोटी रुपयांनी कमी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील पहिल्या सहामाहीत ५०५ कोटींचा कर वसूल केला आहे. गतवर्षी सप्टेंबर अखेरपर्यंत ३ लाख ६६ हजार ६३६ मालमत्ता धारकांनी ५७९ कोटी रुपयांचा कर भरला होता. यंदा ३ लाख ९० हजार मालमत्ता धारकांनी ५०५ कोटींचा कर भरणा केला आहे. त्यामुळे गतवर्षापेक्षा यंदा ७४ कोटींची पिछाडी असल्याचे दिसून येत आहे.



शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा ६ लाख ३२ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून महापालिकेचा कर आकारणी व कर संकलन विभाग कर वसूल करत आहे. गतवर्षी या विभागाच्या वतीने कर संकलनासाठी जनजागृती, जप्ती मोहीम, मालमत्ता धारकांना नोटीसा, नळ कनेक्शन बंद करणे, थकबाकीदारांची वृत्तपत्रात नावांची यादी प्रसिद्ध करणे यासह यंदा महिला बचत गटांच्या माध्यमातून बिलांचे घरपोच वाटप, रिक्षाद्वारे आवाहन, महत्त्वाच्या चौकात होर्डिंग्ज, रिल्स स्पर्धा, सोशल मीडियाचा प्रभावी वापर केला होता.

प्रत्येक व्यक्तीला त्याची मालमत्ता कराची रक्कम आणि सवलतीची रक्कम सांगणारा एसएमएस पाठवला जात होता. अशा विविध बाबींमुळे २०२३-२०२४ च्या पहिल्या सहामाहीत ५८० कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात विभागाला यश आले होते. यंदा मात्र, हा विभाग कर वसुलीत काहींसा पिछाडीवर पडल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे. ६ लाख ३२ हजार मालमत्ता धारकांपैकी ३ लाख ९० हजार ३० मालमत्ता धारकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेत सहा महिन्यांत कराचा भरणा केला आहे. या मालमत्ता धारकांनी ५०५ कोटी ९ लाख ७९ हजार रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा केला आहे.

याबाबत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील म्हणाले की, महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने यंदा मालमत्ता करांची बिले वाटप महिला बचत गटामार्फत करण्यात आले. महिलांनी शंभर टक्के बिलाचे वाटप केले. त्यामुळे नागरिकांनी पहिल्या सहामाहीत कर भरण्यास प्राधान्य दिले. मालमत्ता नोंद अभियानाने वेग घेतला आहे.

### असा झाला कर भरणा

- ऑनलाईन- ३४३ कोटी १२ लाख
- विविध ॲप- १३ कोटी २५ लाख
- रोख- ३८ कोटी ९६ लाख
- धनादेशाद्वारे - ३२ कोटी ३९ लाख
- आरटीजीएस- २० कोटी ११ लाख
- एनईएफटी- १६ कोटी ४ लाख
- डीडी- १ कोटी ८९ लाख

# शहरात 522 शाळाबाह्य विद्यार्थी शिक्षणापासून वंचित

## पिंपरी-चिंचवड शहरात तब्बल 522 शाळाबाह्य विद्यार्थी आढळून आले त्यापैकी 109 विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात घेऊन त्यांची पुनर्नोंदणी करण्यात आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून केलेल्या सर्वेक्षणात पिंपरी-चिंचवड शहरात तब्बल ५२२ शाळाबाह्य विद्यार्थी आढळून आले आहेत. त्यापैकी १०९ विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात घेऊन त्यांची पुनर्नोंदणी करण्यात आली आहे. उर्वरित सर्व मुलांची नोंदणी २० ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे शिक्षण विभागाने उद्दिष्ट ठेवले आहे.



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून शाळाबाह्य मुलांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी शाळाबाह्य मुलांच्या पुनर्नोंदणीचा व्यापक उपक्रम सुरू करण्यात आला आहे. महापालिकेच्या शिक्षण विभागाने, या वर्षी जुलैच्या सुरुवातीला, या शाळाबाह्य मुलांची ओळख पटवण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने सर्वंकष सर्वेक्षण सुरू केले. शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य मुलांचे शिक्षण हक्क कायद्यांतर्गत नोंदणी करण्यासाठी स्वयंसेवकांसोबत सहकार्य करण्याच्या सूचना मुख्याध्यापकांना देण्यात आल्या आहेत.

शिक्षण विभागाने शाळाबाह्य मुलांची तत्काळ नोंदणी समाविष्ट करण्यासाठी मुख्याध्यापकांना शक्य तितक्या मुलांची, विशेषत: असुरक्षित भागातील मुलांची नोंदणी करण्याचे निर्देश दिले आहेत. सध्या, सर्वेक्षणाच्या माध्यमातून ओळखल्या गेलेल्या ५२२ शाळाबाह्य मुलांपैकी १०९ मुले ज्यांची सर्वात असुरक्षित (जन्म प्रमाणपत्र किंवा आधार कार्ड नसलेली) ओळख झाली आहे. दरम्यान, शाळाबाह्य मुलांना शिक्षण हक्क कायद्याच्या कलम ४ नुसार, सहा वर्षाखालील प्रत्येक मुलाने वयानुसार वर्गात नाव नोंदवले पाहिजे. त्यासोबतच, कायद्याच्या कलम ५(३) नुसार कागदपत्रे गहाळ झाल्यामुळे कोणत्याही मुलाला प्रवेश नाकारला जात नाही. त्याचबरोबर, शिक्षण हक्क कायद्याच्या कलम १४(२) नुसार, ज्या मुलाकडे वयाचा पुरावा नसल्यास कोणतीही शाळा सदर मुलास प्रवेश नाकारला जाऊ नये. अशी शिक्षण हक्क कायद्यामध्ये तरतूद असून प्रत्येक मुलाला कायद्याने शिक्षणाचा हक्क दिलेला आहे. तसेच मुलांना शाळेमध्ये जाण्यापासून रोखणारे अडथळे दूर करणे हे आमचे ध्येय आहे. आम्ही शाळाबाह्य मुलांची नावनोंदणी प्रक्रिया कार्यक्षम करण्यासाठी मुख्याध्यापक आणि स्वयंसेवकांसोबत बारकाईने काम करतो आहोत. कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी आम्ही प्रयत्नशील असून महापालिकेच्या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांना शिक्षणाचा हक्क मिळतो आहे, असे साहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांनी सांगितले.

> शिक्षण हा आपल्या समाजाच्या भवितव्याचा पाया आहे. कागदपत्रांच्या अभावामुळे किंवा इतर कोणत्याही अडथळ्यांमुळे कोणतेही मूल त्यांच्या शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित राहू नये. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रत्येक शाळाबाह्य मुलाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका.

> शाळाबाह्य मुलांचे पुनर्नोंदणीचा उपक्रम केवळ किती मुलांची नोंद करण्यात आली हा आकडा दाखविण्यासाठी नसून प्रत्येक मुलाला शिक्षणाचा मूलभूत अधिकार प्राप्त करून देण्यासाठीचे पाऊल आहे. महापालिकेच्या हद्दीतील रुग्णालये आणि स्वयंसेवकांसह यामध्ये समाविष्ट असलेल्यांनी सहकार्य करावे.
>
> - प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका.

# पुण्यात नवरात्रौत्सवानिमित्त वाहतुकीत बदल

## नवरात्र उत्सवानिमित्त शहरातील प्रमुख मंदिरांच्या परिसरात 3 ते 12 ऑक्टोबर दरम्यान वाहतूक बदल

**पुणे | प्रतिनिधी**

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त शहरातील विविध मंदिरांच्या परिसरात भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन वाहतूक बदल करण्यात आले आहेत. श्री तांबडी जोगेश्वरी मंदिर, श्री चतु:श्रृंगी मंदिर, भवानी पेठेतील श्री भवानी माता मंदिर, तसेच सारसबाग येथील श्री महालक्ष्मी मंदिर परिसरात वाहतूक बदल करण्यात आले आहे. या भागातील रस्ते वाहतुकीस बंद करण्यात आले आहेत.



नवरात्रोत्सवात बुधवार पेठेतील श्री तांबडी जोगेश्वरी मंदिराच्या परिसरात भाविकांची गर्दी होते. गुरुवारपासून (३ ऑक्टोबर) अप्पा बळवंत चौक ते बुधवार चौकापर्यंतचा (हुतात्मा चौक) रस्ता वाहतुकीस बंद करण्यात येणार आहे. बुधवार चौक ते अप्पा बळवंत चौक दरम्यान एकेरी वाहतूक सुरु राहणार राहणार असल्याचे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी कळविले आहे. लक्ष्मी रस्त्यावरील गणपती चौक ते श्री तांबडी जोगेश्वरी दरम्यानचा रस्ता वाहतुकीस बंद राहणार आहे.

सकाळ कार्यालयापासून श्री तांबडी जोगेश्वरी मंदिराकडे जाणारा रस्ता अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून अन्य वाहनांनासाठी बंद राहणार आहे. श्री तांबडी जोगेश्वरी मंदिर परिसरात वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे, तसेच शनिवार पेठेतील श्री अष्टभूजा मंदिर परिसरात वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. श्री तांबडी जोगेश्वरी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी वाहने नदीपात्रातील रस्ता, मंडईतील वाहनतळावर लावावीत.

### श्रीसुक्त पठणानिमित्त वाहतूक बदल

**» श्रीसुक्त पठणानिमित्त शुक्रवारी (४ ऑक्टोबर) सकाळी पाच ते सात दरम्यान सारसबाग येथील श्री महालक्ष्मी मंदिर परिसरात वाहतूक बदल करण्यात येणार असून स्वारगेटकडून सारसबागमार्गे स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळ्याकडे जाणारा रस्ता वाहतुकीस बंद करण्यात येणार आहे. मित्रमंडळ चौकाकडून पूरम चौकाकडे येणारा मार्ग वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे. मित्रमंडळ चौकातून येणाऱ्या वाहनांना सावरकर चौकातून सिंहगड रस्तामार्गे इच्छितस्थळी जावे, तसेच सिंहगड रस्त्याने सावरकर चौकात येणाऱ्या वाहनांनी लक्ष्मीनारायण चौकातून इच्छितस्थळी जावे, असे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी कळविले आहे.**

सेनापती बापट रस्त्यावरील श्री चतु:श्रृंगी मंदिर परिसरात गर्दी झाल्यास या भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. या भागात गर्दी वाढल्यास सेनापती बापट रस्त्यावरील वाहतूक वेताळबाबा चौकमार्गे दीप बंगला चौक, ओम सुपर मार्केटमार्गे वळविण्यात येणार आहे.

भवानी पेठेतील श्री भवानी माता मंदिर परिसरात वाहतूक बदल करण्यात आले आहे. नेहरु रस्त्याने श्री भवानी माता मंदिराकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येणार आहे. नेहरु रस्ता ते श्री भवानी माता मंदिर परिसरात वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. गर्दी वाढल्यास नेहरु रस्त्यावरील वाहतुकीत बदल करण्यात येणार आहेत.

# देवीच्या मंदिरांमध्ये पारंपरिक पद्धतीने घटस्थापना

## महारूद्राभिषेक अन् महाआरती, आकर्षक विद्युत रोषणाई : मंदिरे दिवसभर भाविकांसाठी खुली राहणार

**पुणे | प्रतिनिधी**

पितृपक्षाच्या समाप्तीनंतर गुरुवारपासून (दि. ३) आदिशक्तीचा जागर करणाऱ्या शारदीय नवरात्र उत्सवाला प्रारंभ होणार आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदा ते आश्विन शुद्ध नवमी या काळात देवीची उपासना केली जाते. नवरात्रोत्सवासाठी शहरातील सर्व देवींची मंदिरे सज्ज झाली असून, पुण्यासह उपनगरांतील मंदिरांमध्ये गुरुवारी पहाटेच पारंपरिक पद्धतीने घटस्थापना होणार आहेत. त्यानंतर मंदिरे दिवसभर भाविकांसाठी खुली राहणार आहेत.



शारदीय नवरात्रच्या आदल्या दिवशी मध्यवर्ती पुण्यासह उपनगरांतील देवीची मंदिरे व परिसराची रंगरंगोटी, विद्युत रोषणाईची कामे सुरू होती. घरोघरी नवरात्र बसत असल्याने घराची स्वच्छता, देवीच्या पूजेचे साहित्य आणि सार्वजनिक नवरात्रोत्सव साजरा करणाऱ्या मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन सुरू होते. घरांमध्ये घटस्थापनेची पूजा झाल्यानंतर भाविक पहिल्या दिवसापासूनच दर्शनासाठी मंदिरांमध्ये जातात. त्यामुळे मंदिर प्रशासनांनी गर्दीच्या व्यवस्थापनासाठी स्वतंत्र व्यवस्था केली आहे. काही मंदिर व्यवस्थापकांनी सामाजिक उपक्रमांसह भाविकांचा विमा उतरवला असून, सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्हींच्या वापरावरही भर दिला आहे. शहरामध्ये शारदीय नवरात्रोत्सवाची लगबग असताना बंगाली बांधवांच्या ‘बंगिया संस्कृती संसद’ संस्थेनेही दुर्गापूजा, खाद्यजत्रा, बंगाली संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या महोत्सवाचे आयोजन केले आहे.

ग्रामदेवता तांबडी जोगेश्वरी मंदिरामध्ये गुरुवारी पहाटे सहा वाजता घटस्थापना होणार आहे. घटस्थापनेनंतर भाविकांच्या दर्शनासाठी मंदिर रात्री साडेबारापर्यंत खुले राहणार आहे. उत्सवादरम्यान दररोज देवी विविध रूपांमध्ये आणि वेगवेगळ्या वाहनांवर आरूढ झालेली पाहता येणार आहे. शुक्रवार पेठेतील पिवळी जोगेश्वरी मंदिर आणि काळी जोगेश्वरी मंदिरामध्ये सकाळी विधीवत घटस्थापना होणार आहे.

### चतु:श्रृंगी देवीचे मंदिर 24 तास खुले राहणार

**» चतु:श्रृंगी देवीचे मंदिर नवरात्र उत्सवामध्ये भाविकांसाठी २४ तास खुले राहणार आहे. मंदिराचे व्यवस्थापक देवेंद्र अनगळ यांच्या हस्ते सकाळी नऊ वाजता घटस्थापना आणि नवचंडी होम होणार आहे. मंदिरात दररोज सकाळी दहा आणि रात्री नऊ वाजता महाआरती करण्यात येईल. दिवसभर सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम सुरू राहणार आहे. उत्सवादरम्यान निवारा वृद्धाश्रमातील आजींसाठीही विशेष भोंडलाही आयोजित केला आहे.**

सातारा रस्त्यावरील पद्मावती देवस्थान, तळजाई माता देवस्थान, कर्वेनगर येथील वनदेवी आणि उपनगरांमधील देवीच्या मंदिरांमध्ये सकाळच्या पहिल्या टप्प्यातच घटस्थापना होणार आहे.

भवानी पेठेतील श्री भवानी देवी मंदिरामध्ये गुरूवारी पहाटे सहा वाजता महारुद्राभिषेक महापूजा, तुकाराम महादेव दैठणकर यांचे सनईवादन होऊन सकाळी दहा वाजता घटस्थापना होणार आहे. नऊ दिवस दररोज सकाळी सहस्रनाम आणि श्रीसूक्त पठण होणार आहे. रात्री अकरा ते पहाटे पाच या वेळेत मंदिर बंद राहणार आहे. सारसबागेसमोरील श्रीमहालक्ष्मी मंदिर येथे सकाळी आठ वाजता पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते घटस्थापना होणार आहे. तसेच, सायंकाळी सहा वाजता मंदिरावरील विद्युत रोषणाईचे उद्घाटन सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या हस्ते होईल. धार्मिक उपक्रमांबरोबरच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार, कन्यापूजन, विविध शाळांतील शिक्षकांद्वारे भोंडला, वीरमाता-वीरपत्नी सन्मान हे कार्यक्रम होणार आहेत.